# दैनिक अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




सागराचे पाणी कधी आटणार नाही,
भीमरायाची आठवण कधी मिटणार नाही,
अरे एकच जन्म काय हजार जन्म घेतले तरी,
आपल्याकडून बाबासाहेबांचे
उपकार कधी फिटणार नाही

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना
महापरिनिर्वाण दिनी विनम्र अभिवादन


**////आतील पानात वाचा**

- उद्धारली कोटी कुळे, भीमा तुझ्या जन्मामुळे...
- कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार मोठा दिलासा
  कापूस खरेदीची मर्यादा कायम ठेवण्याची आग्रही मागणी
- डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता !



वर्ष : ०५ | अंक : ११३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०६ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# ‘महाराष्ट्र दिल्लीत गहाण’ असल्याची काँग्रेसकडून घणाघाती टीका

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, नागपूर :** महायुती सरकारला सत्तेत येऊन आज एक वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्य सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले. गेल्या एका वर्षात महाराष्ट्राला विकासाऐवजी अराजकता, द्वेष, जाती-जातीतील संघर्ष, कायदा व सुव्यवस्थेचे लक्तर लटकलेले चित्र आणि सरकारी जमिनींची विक्री पाहायला मिळाली, असे घणाघाती आरोप त्यांनी केले. हे वर्ष महाराष्ट्रासाठी दुर्दैवाने लक्षात राहील, असे ते म्हणाले.



सपकाळ म्हणाले की, निवडणुकीच्या वेळी दिलेल्या आश्वासनांपैकी एकही आश्वासन सरकारने पूर्ण केलेले नाही. राज्याचा स्वाभिमान दिल्लीच्या सत्तेकडे गहाण ठेवण्यात आला असून २०१४ ते २०१९ दरम्यानचे देवेंद्र फडणवीस आणि आजचे मुख्यमंत्री यांच्यात जमीन-अस्मानाचा फरक दिसतो. आता महाराष्ट्रासाठी काम करण्याची कोणतीही राजकीय इच्छाशक्ती त्यांच्याकडे उरलेली नाही. सध्या महाराष्ट्राचे खरे मुख्यमंत्री केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आहेत आणि देवेंद्र फडणवीस हे केवळ ‘रबर स्टॅम्प’ म्हणून काम करत आहेत, असा थेट आरोप त्यांनी केला. राज्यातील प्रशासनाला ‘गलथान कारभार’ म्हणून संबोधत सपकाळ यांनी अनेक उदाहरणे दिली. नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्र्याचा निर्णय सरकार एका वर्षात घेऊ शकले नाही, ही त्यांची असमर्थता असल्याचे ते म्हणाले. राज्याला ‘आका’, ‘खोके’, ‘कोयता गँग’, ‘रेती गँग’ यांसारखी गुन्हेगारी शब्दावली सरकारने बहाल केली असल्याची टीका त्यांनी केली. यामुळे राज्यात गुन्हेगारी वृत्तीला खतपाणी मिळत आहे, असेही त्यांनी नमूद केले.

पुण्यातील बलात्कार प्रकरणावर गृहराज्यमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्यावर सपकाळ यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

पीडित महिला ओरडली असती तर बलात्कार झाला नसता, असे अत्यंत असंवेदनशील विधान सरकारच्या गृहराज्यमंत्र्यांकडून केले जाते, हे महाराष्ट्रासाठी लज्जास्पद असल्याचे त्यांनी म्हटले. तसेच त्यांच्या कुटुंबाशी संबंधित डान्स बार प्रकरणाचाही त्यांनी उल्लेख करत सरकारची नैतिकता प्रश्नांकित केली.

विधानसभेत चर्चेऐवजी ‘रमी खेळली जाते’ आणि चर्चा सुरू असताना गुंडागर्दी पाहायला मिळते, असा आरोप करत सपकाळ यांनी सरकारला ‘लाचार’ संबोधले. हे सरकार सत्तेसाठी एकत्र आले असून पुरोगामी विचार, महाराष्ट्र धर्म आणि राजधर्म पाळण्याची त्यांची तयारी नाही. हे अधर्मी, टोळी युद्धाचे आणि बेशरम सरकार असल्याची कठोर टीका त्यांनी केली.

याच वर्षात संतोष देशमुख आणि संपदा मुंडे यांसारख्या हत्याकांडांच्या घटना घडल्या. त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासातील हे सर्वात लाचार सरकार ठरले असल्याचे सपकाळ यांनी म्हटले. जाती-जातीतील आरक्षणाचा संघर्ष, बौद्धिक व मानसिक दिवाळखोरी वाढत असून ती सावरण्याची सरकारकडे कोणतीही योजना नाही, असा आरोप त्यांनी केला. केंद्राकडून केवळ पंतप्रधानांचे नामजप करण्याऐवजी महाराष्ट्रासाठी विशेष आर्थिक पॅकेज आणावे आणि बिघडलेली अर्थव्यवस्था सुधारावी, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच पुढच्या एका वर्षासाठी देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा देत मागच्या एका वर्षामध्ये त्यांची तुलना औरंगजेब क्रूर असल्यामुळे, आणि औरंगजेबाचा जसा कार्यकाळ सुरू होता तशी आपली तुलना ही औरंगजेबाचा कारकिर्दीशी करावी लागली होती. ज्या पद्धतीने थंड डोक्याने महात्मा गांधीचा खून नथुराम गोडसेने केला होता तीच मोडस ऑपरेंटिस देवेंद्र फडणवीस यांची आहे.

त्यांनी असं वागू नये आणि महाराष्ट्राचे जाजवल्य अभिमान आणि सांस्कृतिक बाळगून पुढच्या वर्षीच्या कार्यकाळ त्यांच्या संपन्न व्हावी ही शुभेच्छा त्यांना देत आहोत. असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण व लसीकरण सुरू!



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, बुलडाणा :** सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जिल्ह्यातील भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण, लसीकरण व जंतनिर्मूलन करण्याचे निर्देश दिले आहेत. शहरी व ग्रामीण भागातील मानव-श्वान संघर्ष कमी करण्यासाठी ही महत्वपूर्ण मोहीम राबविण्यात येणार आहे. बैठकीत नगरपरिषद, पोलीस विभाग, पशुसंवर्धन विभाग तसेच प्राणी क्लेष प्रतिबंध सोसायटीच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

- भटक्या श्वानांना पकडण्यासाठी आवश्यक जाळी, प्राणी वाहन व कॅचिंग नेट उपलब्ध करून देण्याचे निर्देश
- श्वानांना मारण्यास सक्त मनाई – त्यांच्यासाठी आश्रय/निवारा उपलब्ध करून देण्यावर भर
- सेवाभावी संस्था व गौशाळांचे सहकार्य घेण्याचे आवाहन
- श्वानांना खाऊ घालण्यासाठी निश्चित ठिकाणे निश्चित करण्याचा निर्णय
- भटक्या जनावरांसाठी तक्रारी नोंदवण्यासाठी हेल्पलाईन सुरू करण्याचा प्रस्ताव
- अँटी रेबीज लस व इम्युनोग्लोबुलिन औषधे शासकीय रुग्णालयात उपलब्ध – याबाबत माहिती फलक लावण्याचे निर्देश
- ग्रामीण भागात खासगी भागीदारीत कोंडवाडे उभारण्याचे नियोजन

जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश सर्व संबंधित विभागांना दिले.

## वृक्षतोडीवरून महायुतीत मतभेद तीव्र !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, नाशिक :** नाशिकच्या तपोवन परिसरातील प्रस्तावित वृक्षतोडीच्या निर्णयावरून आता राजकीय पक्ष देखील आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे. तर प्रशासनाच्या या निर्णयानंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. शिवसेनेकडून (शिंदे गट) आंदोलन करत वृक्ष तोडीच्या प्रस्तावित निर्णयाला तीव्र विरोध करण्यात आला.महायुतीतील घटक पक्षाकडूनच आंदोलन केले जात असल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

गेल्या काही दिवसांपासून तपोवनातील वृक्षतोडीच्या मुद्द्याच्या विरोधात विविध संघटना पर्यावरण प्रेमी वृक्षप्रेमी यांच्याकडून आंदोलन केले जात आहे तर हा निर्णय रद्द करण्यात यावा अशी मागणी देखील करण्यात येत आहे. तपोवन परिसरात शिंदे सेनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी शेकडोच्या संख्येने एकत्र येत हातात वृक्ष तोडीला विरोध दर्शविणारे फलक घेत जोरदार घोषणा करण्यात आली.यावेळी ’वृक्षतोड थांबवा अन्यथा तीव्र परिणाम भोगा’ असा इशारा देखील देण्यात आला. तर संतप्त कार्यकर्त्यांनी थेट करवत आणि कुऱ्हाड जाळून आपला संताप यावेळी व्यक्त केला. या प्रतिकात्मक कृतीतून ’वृक्ष तोडण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होऊ देणार नाही’ असा ठाम संदेश देण्यात आला. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शहर पोलिसांनी तातडीने मोठा पोलिस बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला होता. नाशिक शहर पोलिस आणि दंगा नियंत्रण पथक यावेळी तैनात करण्यात आले होते.आंदोलकांना नियंत्रित ठेवण्यासाठी पोलिसांची कसरत सुरू आहे. त्यामुळे हा वृक्षतोडीचा वाद नेमके कोणते वळण घेतो, याकडे नाशिककरांचे लक्ष लागले आहे.

## मुंबई नाशिक लोकल प्रवासाचे स्वप्न लवकरच प्रत्यक्षात येणार...

### साडेचार हजार कोटींच्या नवीन रेल्वेमार्गास हिरवा कंदील.

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०५, मुंबई :** रेल्वे मंत्रालयाने कसारा ते मनमाड दरम्यान १३१ किलोमीटरचा समांतर रेल्वेमार्ग उभारण्यासाठी हिरवा कंदील दिला आहे.

या नव्या रेल्वे मार्गात कसारा घाटात दोन नवीन मार्ग टाकण्यात येणार आहे. यामुळे अनेक वर्षांपासून रखडलेला कल्याण-नाशिक लोकल रेल्वे गाडीचा प्रकल्प मार्गी लागू शकणार आहे. तसेच मुंबई-नाशिक दरम्यानचा रेल्वे प्रवास अधिक गतिमान होऊ शकणार आहे. या १३१ किलोमीटरच्या प्रकल्पासाठी अंदाजे साडेचार हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

मध्य रेल्वेचा मुंबई ते भुसावळ हा सर्वाधिक वर्दळीचा मार्ग आहे.

या मार्गावरील कसारा घाटामुळे रेल्वे गाड्यांचा वेग मंदावतो तसेच या मार्गावर रेल्वे गाड्यांची संख्या वाढवण्यावर मर्यादा येतात. या पार्श्वभूमीवर रेल्वे मंत्रालयाकडून कल्याण ते कसारा, तसेच मनमाड ते भुसावळ तिसऱ्या व चौथ्या मार्गिकचे काम सुरू आहे. केवळ कसारा ते मनमाड हाच टप्पा बाकी होता. या मार्गावरील वाढता ताण हलका करण्यासाठी कसारा ते मनमाड असा १३१ किलोमीटरचा नवीन समांतर रेल्वेमार्ग उभारला जाणार आहे. रेल्वे मंत्रालयाने प्रस्तावित मार्गाला मंजुरी दिली असून, नवीन रेल्वेमार्ग



इगतपुरी, नाशिक, निफाड, चांदवड व नांदगाव या तालुक्यांतून जाणार आहे. प्रकल्पासाठी आवश्यक जमीन संपादनासाठी शासनाने राजपत्र जाहीर केले आहे. लवकरच सविस्तर अधिसूचना घोषित केली जाणार आहे.

रेल्वे मंत्रालयातर्फे कसारा घाटात नव्याने दोन रेल्वेलाइन टाकण्यात येतील. प्राथमिक आराखड्यानुसार या मार्गावर १८ बोगदे असतील. तसेच घाटातील चढाईची (ग्रेडीयंट) उंची कमी होणार असल्याने विनाबँकर (इंजिन) रेल्वे कसारा घाट पार करतील. त्यामुळे मेल-एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांचा वेग वाढणार आहे. तर कल्याण-नाशिक लोकलसेवा सुरू करण्यासाठी प्रस्तावित मार्ग फायदेशीर ठरेल. त्यामुळे नाशिककरांचे लोकलचे स्वप्न सत्यात उत्तरणार आहे.

**या गावांमध्ये होणार भूसंपादन !**

**निफाड :** चितेगाव, नारायणगाव, चांदोरी, औणे, मौजे सुकेणे, कसबे सुकेणे, पिंपळस, पिंपरी, निफाड, गीलाकुंज, शिवडी, उगाव, थेटले, कोटमगाव, टाकळी विंचूर, पिंपळगाव (नि.)

**नाशिक :** भगूर (एमसीआय), वंजारवाडी, लोहशिंगवे, लहवीत, संसरी, बेलतगव्हाण, विहितगाव, देवळाली, पंचक, एकलहरे, माडसांगवी, शिलापूर, ओढा, लाखलगाव, सिद्ध पिंप्री

**चांदवड :** ताकी खु., वाहेगावसाळ, काळखोडे, तळेगाव रुई, रायपूर, वडगाव पंगू, रापली

**इगतपुरी :** माणिक खांब, नांदगाव बु., बोरटेंभे, नांदूरवैद्य.

दरम्यान या प्रस्तावित रेल्वेमार्गासाठी तातडीने भू-संपादन करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे. रेल्वेने मोजणी शुल्क भरल्यानंतर संयुक्त मोजणीची प्रक्रिया सुरू होईल.

## ठाण्यातील घोडबंदर रोड बनतोय यमसदनाचा मार्ग !

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०५, ठाणे :** घोडबंदर रस्त्याच्या दुरवस्थेमुळे मागील दहा महिन्यात तब्बल १८ जणांचा हकनाक बळी गेल्याची माहिती पुढे आली आहे.दरम्यान या दुर्घटनांची न्यायालयाने देखील गंभीर दखल घेतली असून

विनाहेल्मेट, गाडीचा स्पीड किंवा रस्त्यांवरी खड्डे, अशा अनेक कारणांमुळे रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण वाढल्याचे पाहायला मिळत आहे.या रस्त्यावरून जाताना प्रवाश्यांना

नेहमीच वाहतूककोंडीला सामोरे जावे लागते.वाहने तासंनतास रांगेत उभी असतात. ठाणे शहरातील घोडबंदर मार्गावर जानेवारी ते ऑक्टोबर महिन्यापर्यंत १८ जणांचा रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे मृत्यू झाल्याची माहिती मंगळवारी उच्च न्यायालयाला देण्यात आली. त्याची न्यायालयाने गंभीर दखल घेतली. तसेच या मार्गावर नेहमीच वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते, वाहने तासंनतास रांगेत उभी असतात, त्यामुळे येथून प्रवास करणे दुःस्वप्न असल्यासारखे असल्याचे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले.

ठाण्यात वर्षभरात खड्ड्यांमुळे रस्ते अपघातात एकही मृत्यू न झाल्याचा महापालिकेचा दाव्यावर बोट ठेवून काही प्रसिद्ध झालेल्या वृत्तांनुसार ठाण्यात खड्ड्यांमुळे १८ मृत्यू झाल्याची माहिती याचिकाकर्ते ॲड. रुजू ठक्कर यांनी न्यायालयाला दिली.

पीडितांच्या कुटुंबीयाना भरपाई देण्याची मागणी



केली, तसेच दुरुस्तीच्या एका महिन्यात खड्डे पुन्हा कसे? याची चौकशी करण्याची आणि निकृष्ट कामासाठी दोषी आढळलेल्या कंत्राटदार आणि अधिका-यांवर कठोर शिस्तभंगाची आणि दंडात्मक कारवाई करण्याचीही मागणी केली आहे. त्याची गंभीर दखल घेऊन ही परिस्थिती सुधारण्यासाठी पुढील पावसाळ्याची वाट पाहू नका, असे खडेबोल न्यायालयाने ठाणे पालिकेला सुनावले.

**राज्य सरकार, महापालिका, पीडब्ल्यूडीला नोटीसा**

ठाणे घोडबंदर आणि गायमुख घाटातील अरूंद रस्त्यामुळे अनेक वर्ष वाहतूककोडींची समस्या कायम आहे. त्यात दिवसेंदिवस भरच घडत चालाली आहे. तरीही ठाणे पालिका याकडे गांभीर्याने का पाहत नाही? असा प्रश्न न्या, रेवती मोहिते-डेरे आणि न्या. संदेश पाटील यांच्या खंडपीठाने उपस्थित केला. यावेळी न्यायमूर्तींना आलेला वैयक्तिक अनुभवही त्यांनी सांगितला.

भाईदरजवळील उतन येथे प्रवास करणे अशक्य असल्याचे न्या. डेरे यांनी नमूद केले. दुसरीकडे, वाण्याला उत्तर मुंबई, वसई विरार, भिवंडी, नाशिक आणि गुजरातशी जोडणारा घोडबंदर रोड हा व्यापार आणि वावसायाच्या दृष्टीकोनातून महत्वाचा दुवा आहे. तरीही त्याकडे, प्रशासनाचे दुर्लक्ष असून ११ तास वाहतूककोंडी होणे हे भयावय असल्याचे मत न्या. पाटील यांनी व्यक्त केले. राज्य सरकार, ठाणे महापालिका (टीएमसी) सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) आणि वाहतूक पोलिसांना नोटीस बजावली आणि भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश देऊन न्यायालयाने सुनावणी १५ डिसेंबरला ठेवली.

दरम्यान या प्रश्नी गठीत केलेल्या समितीने २८ सप्टेंबरला डोंबिवलीतील उघड्या नाल्यात वाहून गेलेल्या १३ वर्षीय आयुध कदमच्या पालकांना ६ लाख रुपये भरपाई देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती केडीएमसीच्या वतीने न्यायालयाला देण्यात आली. येत्या दोन आठवड्यात ही रक्कम कुटुंबीयांना देण्यात येईल, तसेच या घटनेसंदर्भात संबंधित अधिका-यांची चौकशीही सुरू असल्याचेही सांगितले.

खड्डे आणि रस्त्यांवरील उघड्या मैनहोल्सच्या प्रश्नावर उब्य न्यायालयाने २०१८ मध्ये सविस्तर आदेश दिले असतानाही त्याची अंमलबजावणी आणि रस्त्यांची देखभाल करण्यात महापालिका प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप करून ॲड. रुजू ठक्कर यानी अवमान याचिका केली आहे.

अक्षराज






## भाजपला दुसरे 'नितीश' सापडले?

बिहारमधील सत्ता राखल्यानंतर आता आणखी एका राज्यात भाजपचं सरकार येण्याची शक्यता आहे. बिहारच्या शेजारीच असलेल्या झारखंडमध्ये लवकरच सत्ता बदल होऊ शकतो. पडद्यामागे सुरु असलेल्या घडाम ोडी पाहता झारखंडमध्ये सत्तांतर होण्याची शक्यता वाढली आहे. मुख्यमंत्री हेमंत सोरेन आणि त्यांच्या आमदार पत्नी कल्पना यांनी नुकताच दिल्ली दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची भेटीगाठी घेतल्याची चर्चा आहे.

झारखंडमध्ये सोरेन यांचा झारखंड मुक्ती मोर्चा सत्तेत आहे. काँग्रेस, राजद आणि डाव्या पक्षांच्या साथीनं सोरेन सरकार चालवत आहेत. गेल्याच महिन्यात बिहारमध्ये विधानसभा निवडणूक पार पाडली. त्या निवडणुकीत झामुमोला १२ जागा लढवायच्या होत्या. पण राजद, काँग्रेसच्या गठबंधननं झामुमोला एकही जागा सोडली नाही. त्याचं शल्य सोरेन यांच्या मनात आहे. तेव्हापासून सोरेन यांचे काँग्रेस, राजद सोबतचे संबंध ताणले गेल्याची चर्चा आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर सोरेन यांचा दिल्ली दौरा महत्त्वाचा ठरला.

मुख्यमंत्री सोरेन यांचा दिल्ली दौरा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी याच दरम्यान झारखंडचे राज्यपाल संतोष गंगवार यांची घेतलेली भेट यामुळे चर्चेला उधाण आलं. सोरेन यांचा दौरा आणि शहा-गंगवार भेटीचं टायमिंग पाहता झारखंडमध्ये सत्ता बदलाच्या चर्चांना वेग आला आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत महागठबंधनचा झालेला दारुण पराभव पाहता सोरेन वेगळा विचार करु शकतात. विशेष म्हणजे सोरेन आणि त्यांच्या पत्नी एक ठरलेला कार्यक्रम सोडून अचानक दिल्लीला रवाना झाले होते. याच सुमारास अमित शहा आणि राज्यपाल संतोष गंगवार यांचीही भेट झाली.

झारखंडमध्ये गेल्या वर्षी विधानसभेची निवडणूक झाली. राज्यात विधानसभेच्या एकूण ८१ जागा आहेत. बहुमतासाठी ४१ जागांची गरज असते. झामुमोनं ३४ जागा जिंकल्या. तर भाजप २१ जागांवर विजयी झाला. काँग्रेसनं १६, राजदनं ३, डाव्या पक्षांनी २ जागांवर यश मिळवलं. सध्या झामुमोची राज्यात सत्ता आहे. सोरेन यांनी एनडीएमध्ये प्रवेश केल्यास ते मुख्यमंत्रिपदी कायम राहू शकतात. भाजप सरकारमध्ये येऊ शकतो. नितीश कुमार यांनी २०१७ मध्ये असा प्रयोग केला होता.

असाच काहीसा प्रकार नोव्हेंबर जुलै २०१७ रोजी बिहारमध्ये घडला होता. २०१५ मध्ये नितीश कुमार यांचा जेडीयू, लालू प्रसाद यादव यांचा राजद आणि काँग्रेसनं आघाडी करत निवडणूक लढवली. भाजप विरोधात त्यांनी विजय मिळवला. या आघाडीनं सत्ता स्थापन केली आणि नितीश कुमार मुख्यमंत्री झाले. पण २०१७ मध्ये नितीश कुमार यांनी भाजप सोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यांनी भाजपशी हातमिळवणी केली. मुख्यमंत्रिपद त्यांच्याचकडे कायम राहिलं.

## शेगाव-जत रस्त्यावर हृदयद्रावक अपघात...

**दि.०५, सांगली :** जतच्या शेगाव रस्त्यावर एका भीषण अपघातात दोन जिवलग मित्रांचा दुर्दैवी मृत्यू झाला. बनाळी फाट्याजवळ ट्रक आणि मोटरसायकलची समोरासम ोर धडक झाली. या अपघातात सचिन गणेश व्हनमाने (वय २१) आणि कामान्ना संगप्पा हत्तळी (वय २५) या दोघांचा जागीच मृत्यू झाला. दोघेही चिक्कलगी, तालुका मंगळवेढा, जिल्हा सोलापूर येथील रहिवासी होते. सचिन आणि काम ान्ना मोटरसायकलवरून शेगावकडून जतच्या दिशेने येत होते, तेव्हा समोरून येणाऱ्या मालवाहतूक ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत कामान्ना यांचा जागीच मृत्यू झाला, तर सचिन यांना रुग्णालयात नेत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. जत पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघाताची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे. हा हृदयद्रावक अपघात जत तालुक्यातील शेगाव रस्त्यावर बनाळी फाट्याजवळ घडला. सचिन गणेश व्हनमाने आणि कामान्ना संगप्पा हत्तळी हे दोघे जिवलग मित्र एकाच मोटरसायकलवर प्रवास करत होते. ते शेगावहून जतच्या दिशेने येत असताना, भरधाव वेगाने येणाऱ्या एका मालवाहतूक ट्रकने त्यांच्या मोटरसायकलला समोरासमोर जोरदार धडक दिली. या भीषण धडकेमुळे मोटरसायकलचा चक्काचूर झाला. अपघाताची तीव्रता इतकी जास्त होती की, कामान्ना हत्तळी यांचा जागीच मृत्यू झाला. तर सचिन व्हनमाने गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने उपचारासाठी जत येथील रुग्णालयात नेण्यात येत होते. मात्र, दुर्दैवाने रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच वाटेतच सचिन यांनीही प्राण सोडले.

# उद्धारली कोटी कुळे, भीमा तुझ्या जन्मामुळे !

६ डिसेंबर १९५६ या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या कोट्यवधी अनुयायांना दुःखसागरात लोटून अनंतात विलीन झाले. त्या काळातील कोट्यावधी अस्पृश्य बांधवांसाठी तो दिवस अत्यंत क्लेशदायक होता. त्या काळातील अस्पृश्य जनतेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपला उद्धारकर्ता मानले होते. हा दिवस आता महापरिनिर्वाण दिन म्हणून ओळखला जातो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन लाखो लोक आजही त्यांना आपला 'मसीहा' मानतात व आजच्या दिवशी आदरांजली वाहतात. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी आजही भरलेली नाही.

आजच्या सोशल मीडियाच्या काळात अमोल बोरुडे या तरुणाने ६ डिसेंबर १९५६ या दिवसाची जिवंत आठवण करून देणारे क्षण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) साहाय्याने तयार केले आहेत. त्याचा हा व्हिडिओ सध्या प्रचंड व्हायरल होत आहे. या व्हिडिओत ६ डिसेंबर १९५६ च्या त्या दिवसाची थेट रिपोर्टिंग दाखवण्यात आली आहे.

रेडिओवरून बाबासाहेब गेल्याची बातमी येताच लोकांच्या प्रतिक्रिया, चैत्यभूमीवरील प्रचंड गर्दी, रडणारे चेहरे, हात जोडलेले अनुयायी सगळेच इतके जिवंत वाटते की डोळे पाणावतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य जातीत जन्माला आले. अब्राहम लिंकन आणि स्टॅलिन यांच्याप्रमाणे त्यांनाही सामाजिक वातावरण अनुकूल नव्हते. तरीही त्यांनी देशाच्या जनजीवनात क्रांती घडवून आणली.

लिंकनने उत्तर व दक्षिण राज्यांना एकत्र करून अमेरिकेतील काळागोऱ्यांतील भेद नष्ट केला आणि लोकशाही राजवटीचा पाया रचला. याउलट स्टॅलिनने व्यक्तिस्वातंत्र्यावर नियंत्रण ठेवून संपूर्ण राज्य समाजसत्तावादी अर्थव्यवस्थेच्या चौकटीत आणले.

डॉ. आंबेडकरांनी लोकशाही आणि समाजवाद यांचा समन्वय साधण्याचे स्वप्न पाहिले. अस्पृश्यता कायद्याने नष्ट केली. म ाणसामाणसातील भेद दूर करण्यासाठी देशाला



संविधान दिले. केवळ अस्पृश्य समाजाचाच नव्हे, तर संपूर्ण भारतीय समाजाचा उद्धार त्यांनी संविधान लिहून केला.

१९१३ ते १९१६ या तीन वर्षांत डॉ. आंबेडकर कोलंबिया विद्यापीठ, न्यूयॉर्क येथे शिक्षण घेत होते. तेथे त्यांनी इतिहास, सम ाजशास्त्र, मानववंशशास्त्र, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि अर्थशास्त्र यांचा सखोल अभ्यास केला.

अमेरिकेतील 'निग्रो प्रॉब्लेम'शी भारतातील अस्पृश्यतेचा संबंध जोडताना त्यांनी भारतातील जाती या निबंधात लिहिले की,

आमचे वंशिक भेद नाहीत; अस्पृश्य सम ाज हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे.

थोडक्यात, डॉ. आंबेडकरांचा लढा हा समतेचा, न्यायाचा आणि मानवतेचा होता.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा! हा संदेश दिला. अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले पाहिजे, कारण त्यातूनच त्यांचा उद्धार होईलहे त्यांनी ओळखले होते.

सिडनहॅम कॉलेजमध्ये पॉलिटिकल इकॉनॉमी या विषयाचे प्राध्यापक म्हणून निवड झाल्यानंतरचा एक प्रसंग त्यांच्या तळमळीचे दर्शन घडवतो. एका अस्पृश्य विद्यार्थ्याच्या नातलगास वाटले की डॉ.आंबेडकर परीक्षक म्हणून त्याला पास करतील. म्हणून ते बाबासाहेबांना भेटायला आले व त्या विद्यार्थ्याला पास करण्याची गळ घालू लागले. परंतु बाबासाहेबांनी स्पष्ट नकार दिला, कारण त्यांचे मत असे होते की अस्पृश्य विद्यार्थी हे इतरांपेक्षा बुद्धिमत्तेत कमी नसावेत.

२१ मार्च १९२० रोजी कोल्हापूर राज्यातील माणगाव येथे अस्पृश्यांची परिषद झाली. या परिषदेत छत्रपती शाहू महाराज उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की

आंबेडकरांमध्ये तुम्हाला तुमचा उद्धारकर्ता लाभला आहे; तो तुमच्या शृंखला तोडल्याशिवाय राहणार नाही. ते भारतातील अग्रगण्य नेत्यांमध्ये सामील होतील.त्यांची ही भविष्यवाणी पुढे खरी ठरली.

नंतर डॉ. आंबेडकरांनी लंडनमध्ये जाऊन D.Sc. आणि M.Sc. या दोन पदव्या संपादन केल्या. विविध आयोगांपुढे, सभांमध्ये आणि आंदोलनांतून त्यांनी अस्पृश्यांच्या म ुक्तीसाठी आपली भूमिका स्पष्ट केली.

त्यांच्या मते, ज्यापर्यंत एवढा मोठा अस्पृश्य समाज हीनदीन अवस्थेत पंगू होऊन आहे, तोपर्यंत हा देशही हीनदीन अवस्थेतच राहील.

ब्राह्मणेतर व अस्पृश्यांच्या प्रगतीबाबत ते म्हणाले

हे दोन्ही समाज एकत्र येऊन आत्मप्रगतीची चळवळ चालवतील, तर पांढरपेशा समाजाच्या गुलामगिरीतून लवकर मुक्त होतील.

१९२७ च्या महाड सत्याग्रहापासून त्यांनी सामाजिक, धार्मिक आणि राजकीय लढ्याची मुहूर्तमेढ रोवली. त्या वेळी त्यांनी आचार–विचार–उच्चार ही त्रिसूत्री स्वीकारण्याचा उपदेश केला.

त्यांनी सांगितलेमृत पशूंचा मांसाहार त्यागा, उष्टे अन्न खाऊ नका, उच्चनीचत्वाच्या कल्पना सोडा, पांढरपेशा व्यवसाय स्वीकारा, शेती करा, स्वच्छ रहा, मुला–मुलींना शिक्षण द्या.

२ ऑक्टोबर १९३० रोजी परळ येथे गोलमेज परिषदेला जाण्यापूर्वीच्या निरोपसम ारंभात ते म्हणाले

अस्पृश्यांनाही स्वराज्य हवे आहे. भावी राज्यघटनेत त्यांना स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे.

गोलमेज परिषद व पुणे करारामधून त्यांनी अस्पृश्यांच्या अधिकारांसाठी तळमळीने लढा दिला.

१९ एप्रिल १९४२ रोजी चौपाटीवरील वाढदिवस समारंभात त्यांनी सांगितलेइतरांच्या मदतीवर जगू नका; स्वावलंबी व्हा.म हाभारतातील कचाच्या उदाहरणाने त्यांनी युवकांना आपल्या समाजाला न सोडण्याचा उपदेश केला.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे डॉ. आंबेडकरांनी विशाल जनसमुदायास बौद्ध धम्माची दीक्षा दिली. त्यांनी सांगितले

जसे शरीर निरोगी असावे, तसे मनही सुसंस्कृत असावे.गरीब माणसाला धर्माची आवश्यकता अधिक असते.

एकूणच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि धार्मिक परिवर्तन घडवण्यात यशस्वी झाले. म्हणूनच ते आजही कोट्यवधी जनतेचे उद्धारकर्ता म्हणून पूजले जातात.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## बाबासाहेब...

होई उत्कर्षमार्गस्थ
समस्त दीन दलीत
भिमरावाचा संघर्ष
प्रत्यक्षात ये फलीत

हादरून गेले क्षणी
मस्तावलेविस्तापीत
अंधारमय जीवनास
प्रज्ञा संदेश समर्पित

शिक्षण द्वारे खोली
बाबा विद्याविभुषीत
प्रेरकतारकउध्दारक
समृद्ध झाले शोषित

नव युगा नीळा सूर्य
डॉक्टर सार्थ प्रेषित
मागास आणला पुढे
प्रगत पथी पददलीत

महिला वर्गा जागृती
आशा हो प्रफुल्लित
धन्यवाद देतात नारी
यशजिंके अस्खलित

वाचनभूक असूनही
न मात्र पुस्तकपंडित
शेवटच्याला शिक्षण
उर्जा झाले अखंडीत


निळ्या सूर्याची उर्जा
भवितव्य उज्वलित
दूरदर्शी तव बांधणी
समाज हो उन्मीलित

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता !

**विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा आज महापरिनिर्वाण दीन. महापरिनिर्वाणदिनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन!**

जागतिक कीर्तीचे विचारवंत अशी ओळख आलेल्या विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे विचारवंत म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जगभर ओळख आहे मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्या जाहिराती किंवा शुभेच्छा संदेश दिल्या जातात त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची ओळख दलितांचे उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशीच करून दिली जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे दलीत उद्धाराचे कार्य तर जगजाहीर आहे. जगाला हेवा वाटेल अशी राज्यघटना त्यांनी देशाला दिली. त्यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेला आपला देश एकसंघपणे बांधला गेला आहे. भारतासारखी राज्यघटना नसल्याने भारताच्या शेजारी असलेल्या देशांची आज काय अवस्था झाली आहे हे आपण पाहतोच आहे. त्यामुळे त्यांची दलीत उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ही ओळख यथायोग्यच असली तरी त्यांचे कार्य केवळ एवढ्या पुरतेच मर्यादित नाही. थोर अर्थतज्ज्ञ, महिलांचे उद्धारक, कृषी तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, जलतज्ज्ञ इतिहास तज्ज्ञ, समाज शास्त्रज्ञ, कायदेपंडित, धर्म चिकित्सक, राजनीती तज्ज्ञ, कामगार नेते, शांतीचे उपासक, कलाप्रेमी, लेखक, पत्रकार असे विविध पैलू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे हे विविध पैलू कायम दुर्लक्षित केले जातात म्हणूनच मी माझ्या महिलांचे उद्धारक डॉ.बाबासाहेब आंबेडकर व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषक धोरण या मागील दोन लेखात डॉ.बाबसाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेले कार्य आणि




जलतज्ज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर या दोन पैलूंची ओळख करून दिली होती आज मी डॉ बाबसाहेब आंबेडकरांची पत्रकार म्हणून असलेल्या पैलूंची ओळख करून देणार आहे.

डॉ.बाबसाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेचा प्रवास मूकनायक पासून सुरू झाला. नंतर हा प्रवास बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत पर्यंत सुरूच राहिला. सामाजिक आणि राजकीय ध्येयासाठी स्वतःचे वर्तमानपत्र असावे असे डॉ.बाबसाहेब आंबेडकरांना वाटले म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. दलितांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्याचं काम मूकनायक पाक्षिकानं निष्ठेनं केलं. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते. सुरुवातीला पांडुरंग नंदराम भटकर पाक्षिकाचे संपादक होते. त्यानंतर मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी असणारे ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे संपादक पदाची जबाबदारी आली. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. 'मूकनायक' पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. 'मूकनायक' एप्रिल १९२३ मधे बंद पडले.

इ.स. १९२४ मध्ये डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. ३ एप्रिल १९२४ रोजी बहिष्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी समता हे वृत्तपत्र सुरू केले. हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. २४ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांनी जनता तर ४ फेब्रुवारी १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र सुरू केले. इ.स. १९४४ मध्ये बाबासाहेबांनी आम्ही शासनकर्ती जमात बनणार या शीर्षकाखाली जनता वृत्तपत्रात लेख लिहिला. या वृत्तपत्रांद्वारे आपल्या विचारांनी त्यांनी स्पृश्य आणि अस्पृश्यांना जागृत केले. त्यांची लेखनी झुंजार, क्रांतिकारी आणि प्रभावी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेमध्ये प्रकाशित झालेत कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र होते आणि मराठी तिथली लोकभाषा आहे. बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड विद्वान होते. परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली की त्यावेळी महाराष्ट्रातील बहुतांश दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समजू शकत होती.गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, या मुकनायकाने बहिष्कृत भारतामधील लोकांना प्रबुद्ध भारताकडे नेले. बाबासाहेब महान पत्रकार होते.

पत्रकार महामानव डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी विनम्र अभिवादन!!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा, पुणे.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## पारनेर विसापूर रस्ता बनला मृत्यूचा सापळा



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०५, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील पारनेर विसापूर रोड हा गणपती फाटा ते म्हसणे फाट्यापर्यंत अतिशय खड्डेमय झालेला असून मोठ्या प्रमाणात अपघाताचे प्रमाण वाढले आहे. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी बांधकाम विभाग ब्र शब्द काढायला तयार नाही. पारनेर तालुक्यात प्रशासकीय अधिकारी मनमानी पद्धतीने काम करत आहेत हे यातून स्पष्ट होत आहे. पारनेर विसापूर रोडवर म्हसने फाटा एम.आय.डी.सी मुळे कामगारांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. तसेच पारनेर हे तालुक्याचं ठिकाण असल्या कारणाने शाळा कॉलेज तसेच तहसील कचेरीमुळे प्रवासी मोठ्या प्रमाणात वाहतूक करत असतात. या खड्ड्यांमुळे अनेक नागरिकांचे अपघात होऊन अपंगत्व आले आहेत. तरी या रस्त्यांची लवकरात लवकर दुरुस्त करावे असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) पारनेर तालुका युवती कार्याध्यक्ष सोनाली कुलथे यांनी निवेदनात म्हटले आहे.

## परिमंडळ ३ कल्याणला अत्याधुनिक फॉरेन्सिक व्हॅन; गुन्हे तपासाला वेग



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०५, कल्याण (ठाणे) :** कल्याण परिमंडळ ३ कल्याणसाठी महाराष्ट्र शासनाने अत्याधुनिक फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून दिली असून ती आजपासून नियमित सेवेत दाखल झाली आहे. गृह विभागाच्या शासन निर्णय क्र. एफएसएल ०४२४/प्र.क्र. २०५/पोल-४ दि. २२/०७/२०२५ नुसार ही सुविधा उपलब्ध झाली आहे. फॉरेन्सिक व्हॅनसोबत सहाय्यक रासायनिक विश्लेषक, वैज्ञानिक सहाय्यक आणि प्रयोगशाळा परिचर अशी तज्ज्ञांची टीम घटनास्थळी तत्काळ दाखल होऊन पुरावे गोळा करणार आहे. भौतिक, रासायनिक, जैविक व डिजिटल पुरावे गोळा करण्यासाठी आवश्यक उपकरणे, किट्स व रसायने या व्हॅनमध्ये उपलब्ध आहेत. या सुविधेचा लाभ परिमंडळातील ८ पोलीस ठाण्यांना मिळणार आहे. यात महात्मा फुले चौक, बाजारपेठ, कोळसेवाडी, खडकपाडा, डोंबिवली, विष्णुनगर, मानपाडा आणि टिळकनगर या पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. गुन्हा घडल्यानंतर घटनास्थळी तातडीने वैज्ञानिक पद्धतीने पुरावे संकलित केल्याने तपास प्रक्रियेला गती मिळणार असून अहवाल लवकर तयार होणार आहेत. यामुळे आरोपींच्या विरोधातील पुरावे न्यायालयात अधिक ठोसपणे सादर करता येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. फॉरेन्सिक व्हॅन आणि दोन स्वतंत्र टीम्स दिवसरात्र २४ तास कल्याण येथील नियंत्रण कक्षामध्ये उपलब्ध राहणार आहेत. त्यामुळे परिमंडळ ३ मधील गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण वाढण्यास मदत होणार आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## साकेत कॉलेजमध्ये नशामुक्त भारत आणि सायबर जनजागृती अभियान



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०५, कल्याण (ठाणे) :** कोळसेवाडी पोलीस स्टेशन व ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या संयुक्त विद्यमाने साकेत कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, कल्याण (पूर्व) येथे अमली पदार्थ विरोधी नशामुक्त भारत तसेच सायबर गुन्हे जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम सकाळी १०.३० ते १२.४५ या वेळेत पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस उपायुक्त, परिमंडळ ३ कल्याण चे अतुल झेंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याण विभाग कल्याणजी घेटे, साकेत कॉलेजचे सचिव साकेत तिवारी आणि प्राचार्य संतोष तिवारी प्रमुख उपस्थित होते. या प्रसंगी डीसीपी झेंडे यांनी साकेत कॉलेज, के.डी. कॉलेज व मॉडेल कॉलेजच्या उपस्थित विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे दुष्परिणाम, त्यापासून दूर राहण्याचे महत्त्व तसेच वाढत्या सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे. याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. याशिवाय सायबर पोलीस स्टेशन ठाणे येथील पोनिरी. आजगावकर, पोनिरी. (गुन्हे) गणेश न्हायदे, गौतम बेंडकुळे तसेच दिशा फाउंडेशनच्या प्रतिनिधींनीही विद्यार्थ्यांना माहितीपर मार्गदर्शन करून जनजागृती केली. कार्यक्रमाला २०० ते २३९ विद्यार्थी तसेच शिक्षकवर्ग उपस्थित होता. समाजातील तरुणांमध्ये जागरुकता निर्माण करण्याच्या हेतूने पोलिस विभागाकडून राबविण्यात आलेला हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरल्याचे कॉलेज प्रशासनाने सांगितले.

## बोधिसत्व सामाजिक संस्थेतर्फे भीम अनुयायांना अल्पोपहार वाटप

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.०५, मुंबई :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर येथील चैत्यभूमी येथे देशाच्या काना कोपऱ्यातून महामानवाला अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या भीम अनुयायांना सांगली जिल्ह्यातील कडेगाव तालुक्याच्या विहापूर येथील पंचशील मित्र मंडळ व बोधिसत्व सामाजिक संस्था यांच्या वतीने अल्पोपहाराचे वाटप करण्यात येणार आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, दरवर्षी ०६ डिसेंबर रोजी महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर येथील चैत्यभूमीवर लाखोंचा जनसमुदाय बाबासाहेब यांना अभिवादन करण्यासाठी येत असतो हा जनसमुदाय आपल्या छोट्या मोठ्या चिलापीलांना घेऊन येथेच ऊन वारा पाऊस अथवा थंडीची यांची तमा न बाळगता अभिवादन करण्याच्या रांगेमध्ये दिवसभर उपाशी तापाशी उभे राहतात. या समाज बांधवांनी उपाशी राहू नये म्हणून अनेक राजकीय पक्ष सामाजिक संस्था यांच्यावतीने अल्पोपार व जेवणाची सोय करण्यात येते. तद्वतच सांगली जिल्ह्यातील कडेगाव तालुक्याच्या बोधिसत्व सामाजिक संस्था आणि मुंबई स्थीत काही सदस्य यांच्या वतीने चवदार व गरमागरम अल्प उपहार वाटप करण्यात येणार आहे. असे पंचशील मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी कळवले आहे. या कामी मुंबई महानगरपालिकेच्या शारीरिक शिक्षण विभागाचे शिक्षक संजय माने आणि त्यांचे सहकारीही पुढाकार घेत आहेत.

# कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार मोठा दिलासा

## आ. मुनगंटीवार यांची कापूस खरेदीची मर्यादा कायम ठेवण्याची आग्रही मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार पुन्हा एकदा चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी धावून आले आहेत. कापूस खरेदीची सीसीआयने ठरविलेली मर्यादा अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. हे नुकसान रोखण्यासाठी 'मागील वर्षाप्रमाणेच प्रती हेक्टरी ३०-४० क्विंटलची मर्यादा कायम ठेवावी' अशी आग्रही मागणी दि.३ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानभवनातील मुख्यमंत्री कार्यालयात भेट घेऊन त्यांनी केली.

या गंभीर विषयावर मुख्यमंत्री यांनी तत्काळ प्रतिसाद देत कृषी आणि सहकार विभागाच्या प्रधान सचिवांना त्वरीत कार्यवाहीचे निर्देश दिले. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कापूस खरेदीसाठी प्रती हेक्टरी १३.५७ क्विंटलची अत्यल्प मर्यादा जाहीर करण्यात आली असून प्रत्यक्षात चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी २५ ते ४० क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन घेणारे आहेत. त्यामुळे या



निर्णयामुळे शेतकऱ्यांचे गंभीर आर्थिक नुकसान होणार आहे. सन २०२४-२५ मध्ये या दोन्ही जिल्ह्यांसाठी ३० क्विंटलची मर्यादा लागू होती आणि शेतकऱ्यांनी त्यानुसार खरेदी-विक्री प्रक्रिया पूर्ण केली होती. त्यामुळे चालू हंगामातही ३०-४० क्विंटलचीच मर्यादा ठेवण्याची मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली आहे. अधिक उत्पादन घेतलेल्या शेतकऱ्यांना एमएसपीपेक्षा कमी दरात व्यापाऱ्यांना विक्री करण्याची वेळ येऊ नये, हा या मागणी मागील मुख्य उद्देश आहे.

यापूर्वी, यासंदर्भात त्यांनी सीसीआयचे संचालक ललितकुमार गुप्ता यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली असून त्यांनीही सकारात्मक भूमिका दर्शविली होती. मारेगाव (यवतमाळ) कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रमन शाम डोये यांनी याबाबत निवेदन दिल्यानंतर आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेतली. मुख्यमंत्र्यांनी तात्काळ दखल घेत प्रधान सचिव कृषी आणि प्रधान सचिव सहकार यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. यामुळे आता आ. मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळणार आहे.

### शेतकऱ्यांसाठी कायम पुढाकार

पालकमंत्री असताना त्यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विक्रमी २०२ कोटींचा पीक विमा मिळवून दिला. अलीकडेच २० हजार हेक्टरनुसार मिळणाऱ्या धान बोनससाठी २२७ कोटी रुपयांची तरतूद करून ती शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यास त्यांचा पाठपुरावा कारणीभूत ठरला. धान चुकत्याचे २७.५२ कोटी रुपये मंजूर करवून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम त्यांच्या पुढाकारातून झाले. शेतकऱ्यांच्या प्रत्येक प्रश्नावर सातत्याने लढण्याची त्यांची तयारी हीच त्यांची कार्यशैली सिद्ध करते.

## नागपूर पदवीधर मतदार संघासाठी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द; १८ डिसेंबर पर्यंत दावे व हरकती आमंत्रित

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** नागपूर विभागातील पदवीधर मतदार संघासाठी १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नव्याने मतदार यादी तयार करण्याचे काम सुरू आहे. ३० सप्टेंबर ते ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत प्राप्त अर्जांच्या आधारे नागपूर विभागाच्या मतदार नोंदणी अधिकारी तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी पहिली प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध केली आहे. येत्या १८ डिसेंबर पर्यंत यासंदर्भात दावे व हरकती स्वीकारण्यात येणार असून १२ जानेवारी २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. मतदार नोंदणीची प्रक्रिया पुढील वर्षी निवडणूक कार्यक्रम जाहीर होईपर्यंत सुरु राहणार आहे.

विधानपरिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीच्या नागपूर विभागातील पदवीधर मतदार संघाचे सदस्य अभिजित वंजारी हे ६ डिसेंबर २०२६ रोजी निवृत्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर पदवी निकाल लागल्यापासून १ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ३ वर्ष पूर्ण झालेल्या पदवीधरांसह सद्या मतदार यादीत नाव समाविष्ट असलेल्या सर्व पदवीधरांसाठी ३० सप्टेंबर २०२५ पासून नव्याने मतदार नोंदणी करण्यात येत आहे. ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत विभागातील ६ जिल्ह्यांमधून १ लाख १० हजार ९५६ अर्ज प्राप्त झाले. यापैकी ३ हजार ७४१ अर्ज त्रुटींमुळे रद्द झाले. अर्ज रद्द झालेल्या पदवीधरांना येत्या १८ डिसेंबरपर्यंत दावे व हरकती घेता येणार आहे. या हरकतींवर निर्णय होवून १२ जानेवारी २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

### जिल्हानिहाय झालेल्या अर्जाची नोंद -

नागपूर विभागीय ६ जिल्ह्यांमध्ये एकूण २५६ मतदान केंद्रांवर ६७ हजार ३१८ पुरूष आणि ३९ हजार ८९० महिला व इतर ७ अशा एकूण १ लाख १० हजार ९५६ पदवीधरांनी नोंदणी केली आहे. नागपूर जिल्ह्यात १ ते १३९ मतदान केंद्रावर ३६ हजार ४४२ अर्जांची नोंद झाली. यातील १ हजार ४४५ अर्ज नामंजूर झाले तर उर्वरित ३४ हजार ९६७ अर्ज मंजूर झाले आहेत. भंडारा जिल्ह्यात १४० ते १५७ मतदान केंद्रावर १३ हजार ५२२ अर्जांची नोंद झाली. यातील ५१४ अर्ज नामंजूर झाले तर उर्वरित १३ हजार ८ अर्ज मंजूर झाले आहेत. गोंदिया जिल्ह्यात १५८ ते १७४ मतदान केंद्रावर १६ हजार २६८ अर्जांची नोंद झाली. यातील ५२६ अर्ज नामंजूर झाले तर उर्वरित १५ हजार ७४२ अर्ज मंजूर झाले आहेत. वर्धा जिल्ह्यात १७५ ते २०३ मतदान केंद्रावर १२ हजार ४२९ अर्जांची नोंद झाली. यातील ५६७ अर्ज नामंजूर झाले तर उर्वरित ११ हजार ८६२ अर्ज मंजूर झाले आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात २०४ ते २३९ मतदान केंद्रावर २१ हजार ९९ अर्जांची नोंद झाली. यातील ३३८ अर्ज नामंजूर झाले तर उर्वरित २० हजार ७६१ अर्ज मंजूर झाले आहेत. गडचिरोली जिल्ह्यात २४० ते २५६ मतदान केंद्रावर ११ हजार २२६ अर्जांची नोंद झाली यातील ३५१ अर्ज नामंजूर झाले तर उर्वरित १० हजार ८७५ अर्ज मंजूर झाले आहेत. प्राप्त अर्जातील नामंजूर झालेल्या अर्जदारांना १८ डिसेंबर २०२५ पर्यंत प्रारूप मतदार यादीवर दावे व हरकती स्वीकारून निकाली काढण्यात येतील. त्यानंतर १२ जानेवारी २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया पुढील वर्षी नागपूर पदवीधर मतदार संघाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होईपर्यंत नमुना १८ अर्ज तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय व विभागीय आयुक्त कार्यालयात स्वीकारले जाणार आहेत. ६ नोव्हेंबर २०२५ नंतर प्राप्त अर्ज हे पुरवणी स्वरूपात अंतिम यादी सोबत एकत्रितपणे संलग्न करण्यात येतील, असे उपजिल्हाधिकारी (निवडणूक) संजीव देशमुख यांनी कळविले आहे.

## जीवन समृद्ध करण्यासाठी वाचनालये आवश्यक – रविंद्र भारती

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०५, पाटण (सातारा) :** केवळ ग्रंथ पुरवून वाचकांची केवळ वाचनाची भूक न भागविता विविध उपक्रम राबवून त्याद्वारे वाचकांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे हे उद्दीष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून गेल्या ३२ वर्षांपासून दिवशी येथील ज्ञानांकुर वाचनालय आपला किर्तीध्वज उंचावत आहे. १२ हजारापेक्षा अधिक ग्रंथसंपदा असलेल्या या वाचनालयाच्या नावावर अनेक पुरस्कारही आहेत. सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्यासाठी तसेच वाचन संस्कृती वाढविण्यासाठी वाचनालये आवश्यक आहेत. असे मत अश्वमेध समूहाचे अध्यक्ष रविंद्र भारती यांनी व्यक्त केले. ते दिवशी या ठिकाणी ज्ञानांकुर ग्रंथालयाच्या ३२ व्या वर्धापन दिन कार्यक्रमात पुरस्कार वितरणावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ सहित्यिक डॉ. राजेंद्र माने होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून दिवशी गावच्या सरपंच सुवर्णा सूर्यवंशी व ग्रंथमित्र प्रा.डी.डी.थोरात हे उपस्थित होते.

रविंद्र भारती पुढे म्हणाले, ग्रंथामुळे माणसे सुसंस्कृत व प्रगल्भ होत असतात. आजकाल ची पिढी टी.व्ही. व मोबाईल इंटरनेट च्या काळात नवी पिढी वाचनापासून दूर जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यासाठी त्यांच्यावर वाचनाचे संस्कार करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांनी अश्वमेध वाचनालयात होणारे विविध उपक्रम व प्रतिभा गौरव साहित्य संमेलन याबाबत थोडक्यात माहिती सांगितली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा.डी.डी. थोरात यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. त्यानंतर पुरस्कार वितरण कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी विविध पुरस्कार देण्यात आले. कै. दादू रामचंद्र थोरात यांचे स्मरणार्थ उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार २०२५ हा अश्वमेध ग्रंथालय व वाचनालय सातारा यांना देण्यात आला, कै. गोपाळा बंडू थोरात यांचे स्मरणार्थ उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कार २०२५ तीन साहित्यकृतीना मिळाला असून त्यामध्ये मारुती कुरणे यांच्या 'उबदार गोधडी' आत्मकथन या पुस्तकास तर दुसरा करंजाडे,पनवेल येथील प्रवीण बोपुलकर यांच्या 'अवतरणचिन्ह' या कवितासंग्रहास मिळाला असून तिसरा सातारा येथील राजेंद्र घाडगे यांच्या 'शिवरायांचे थोरले बंधू संभाजीराजे' या ऐतिहासिक ग्रंथास मिळाला. त्याच बरोबर कै.यशवंत महादेव सूर्यवंशी स्मरणार्थ दिला जाणारा पुरस्कार 'निसर्गाचे गोड गुपित' डॉ. मोहन सुखटनकर व 'गमतीची बाग' ॲड. संगीता केंजळे यांच्या पुस्तकास मिळाला त्याचबरोबर विशेष पुरस्कार म्हणून सुभाष गुरव यांच्या 'ठिणग्या' या कथासंग्रहास व डॉ. आदिती काळमेख यांच्या 'जगणे गोंदून घेताना' या कविता संग्रहास मिळाला. अध्यक्षीय मनोगतात डॉ.राजेंद्र माने म्हणाले की, ग्रंथातून जाणीव जागृती निर्माण होते. माणूस विचारशील बनतो.




वाचनाने माणूस ज्ञानी होतो आणि त्याला पुस्तकाच्या रूपाने एक नवीन मित्र मिळतो. वाचन ही एक कला आहे. वाचन माणसाला माणूस बनविते, जीवनाला एक नवी दिशा देते, विचार करायला शिकविते, अंतर्मुख करविते, त्याचप्रमाणे जीवनात योग्य- अयोग्य काय याची जाणीव करून देते. यावेळी डॉ. सुखटनकर प्रा. डॉ. आर. के निमट, राजेंद्र घाडगे, डॉ. आदिती काळमेख, सुनिता कदम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी विवेक सूर्यवंशी यांनी आभार मानले, तर एस.आर. कदम यांनी सूत्रसंचालन केले. राजाराम राक्षे यांनी पुरस्कार वितरण कार्यक्रम संचालन केले.सदर कार्यक्रमासाठी ज्ञानांकुर ग्रंथालयाचे कोषाध्यक्ष एम.आर.पाटील, जे.बी.सूर्यवंशी, उत्तम पाटील, शंकर कदम, भीमराव शेवाळे, डी.बी.थोरात, दिपाली थोरात, बी.डी. कॉलेजचे प्रा. डॉ. एल.एस. भिंगारदेवे, प्रा. विशाल कांबळे तसेच दिवशी गावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

## आंतरराष्ट्रीय परिषदेत नवी मुंबई मनपा चे 'मॅनहोल टू मशीनहोल' या विषयावर प्रभावी सादरीकरण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०५, मुंबई :** 'वर्ल्ड टॉयलेट समिट २०२५' या जागतिक स्तरावरील परिषदेत नवी मुंबई महानगर पालिकेस 'मॅनहोल टू मशीनहोल' या यशस्वी अंमलबजावणी झालेल्या उपक्रमाच्या सादरीकरणासाठी निमंत्रित करण्यात आले होते. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नवी मुंबई महानगरपालिकेस आपले उल्लेखनीय उपक्रम मांडण्याची संधी मिळणे हा महानगरपालिकेचा जागतिक स्तरावर झालेला गौरव आहे.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मान्यतेने व अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, नमुंमपा उपअभियंता स्वप्नील देसाई यांनी 'मॅनहोल टू मशीनहोल - ऑपरेशन्समधील कार्यक्षमता' या विषयावर नवी मुंबई महानगरपालिकेचे प्रतिनिधित्व करुन प्रभावी सादरीकरण केले. या माहितीपूर्ण सादरीकरणाची विविध देशातील उपस्थित प्रतिनिधींनी प्रशंसा केली. तसेच अनेक देशाच्या प्रतिनिधींनी या मॉडेलचा अभ्यास करुन ही कार्यप्रणाली अंगीकारण्याबाबत सकारात्मकता दर्शवली. वर्ल्ड टॉयलेट ऑर्गनायझेशनचे संस्थापक जॅक सीम यांच्या हस्ते नवी मुंबई महानगरपालिकेचा सन्मान करण्यात आला. या परिषदेस भूतान, कॅनडा, कतार, द.आफ्रिका, सिंगापूर, थायलंड, बांग्लादेश, स्वीडन व इतर देशांतील तसेच भारतातील विविध मोठ्या शहरांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

